यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

प्रेषक : प्रा. विजयकुमार पाईकराव ,
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

प्रति : मा. जनसंपर्क अधिकारी

विषय : शिक्षणशास्त्रातील विविध पुरस्काराची बातमी प्रसिद्धी बाबत.

धारिका : शिशा/पुरस्कार/२०२६/

दिनांक : १४/१०/२०२६

कृपया, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत विषय क्र. १९५.३.५ मान्यतेनुसार शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत १. डॉ. मधुभाई बुच कृतज्ञता पुरस्कार, २. डॉ. रविंद्र दवे प्रेरणा पुरस्कार, आणि ३. डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ट शिक्षण ग्रंथ पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्याची सविस्तर माहिती व अंतिम मुदत खालीलप्रमाणे आहे. त्यास विविध वृत्तपत्र माध्यमात व विद्यापीठाच्या Whatsapp Group व संकेतस्थळावर प्रसिद्धी द्यावी ही विनंती.

१. डॉ. मधुभाई बुच कृतज्ञता पुरस्कार :

- **डॉ. मधुभाई बुच कृतज्ञता पुरस्कार शिक्षणशास्त्र अध्यापक पात्रता :** हा पुरस्कार १ जून २०२५ ते ३१ मे २०२६ या काळात पूर्णतः सेवानिवृत्त झालेले आणि अध्यापक शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केलेले सन्माननीय शिक्षक प्रशिक्षकांना (अध्यापकाचार्य) ज्यांचे वय वर्ष ६०/६२/६५/७० पूर्ण झालेले आणि ते आता सेवानिवृत्त जीवन जगत आहे अशा अध्यापकाचार्यांचे (बी.एड., बी.पी.एड., बी.एस्सी.बी.एड., बी.ए.बी.एड., एकात्मिक बी.एड. येथे सेवा करून निवृत्त झालेल्या अध्यापकाचार्यांचे नाव संक्षिप्त परिचय, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल, अलीकडे काढलेल्या फोटोसह **मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा,** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या नावे टपालाने किंवा dir_edu@ycmou.digitaluniversity.ac या ई-मेलवर दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पाठवावी. सदर माहिती अध्यापकाचार्यानी स्वतः न पाठवता आपले सहकारी वृंद, नातेवाईक, विद्यार्थी इत्यादीनी शिफारस व त्यांच्या संमतीसह पाठवावी.
- **पुरस्काराचे स्वरूप :** रक्कम रुपये २१,०००/- (एकवीस हजार मात्र) मानपत्र आणि स्मुर्तीचिन्ह

२. डॉ. रविंद्र.एच. दवे प्रेरणा पुरस्कार :

- **डॉ. रविंद्र.एच. दवे प्रेरणा पुरस्कार शिक्षणशास्त्र अध्यापक पात्रता:** हा पुरस्कार शिक्षक प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले शिक्षणशास्त्रातील अध्यापक, ज्यांचे वय ३० जून २०२६ रोजी, ४० वर्षांपेक्षा कमी आहे आणि ते पीएच.डी. पात्रताधारक असून किमान सात वर्षे शिक्षक प्रशिक्षक म्हणून कार्यानंद केलेला आहे. तसेच सध्या शिक्षक प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. अशा व्यक्ती या पुरस्कारासाठी पात्र आहेत. अशा सर्व इच्छुक शिक्षणशास्त्र अध्यापकांनी आपला बायोडाटा मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या नावे टपालाने किंवा dir_edu@ycmou.digitaluniversity.ac या ई-मेलवर दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पाठवावा.
- **बायोडेटासाठी उपमुद्दे :** प्रस्ताव पाठवितांना संबंधित शिक्षक प्रशिक्षकांनी आपले पूर्ण नाव, जन्मतारीख, शिक्षण, अनुभवसेवा कालावधी, सध्याचे सेवेचे ठिकाण इ. माहितीसह स्वतंत्र कोऱ्या

कागदावर सुवाच्च अक्षरात लेखन करून किंवा टंकलिखित करून पाठवावेत. तसेच त्यासोबत परिषदा/सेमिनार/सादरीकरणे, संघटना सदस्यत्व, पुरस्कार, अध्यापन कार्य सेवा वर्ष, विस्तार सेवा कार्य/नाविन्यपूर्ण कार्य, पुस्तक लेखन/संपादन, पेपर प्रकाशन, MOOC विकसन व गुगल स्कॉलरवरील पेपर, पेटंट, ऑडीओ / व्हिडीओ (e- साहित्य विकसन), मुक्त विद्यापीठातील संमंत्रण, समन्वयक, संचालक, पाठ्यपुस्तक लेखन इ. कार्याचे प्रमाणपत्रे उपस्थितीपत्रे यांची सत्यप्रत प्रस्तावासोबत स्वतंत्र फाईल करून प्रस्ताव पाठवावेत.

- **पुरस्काराचे स्वरूप :** रक्कम रुपये १५,०००/- (पंधरा हजार मात्र), मानपत्र आणि स्मृतिचिन्ह.

३. डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार

- **डॉ. आनंद वास्कर उत्कृष्ट शिक्षणशास्त्र ग्रंथ पुरस्कार : या** पुरस्कारासाठी दिनांक १ जुलै २०२१ पासून ते ३० जून २०२६ या कालावधीत प्रथम प्रकाशन म्हणून प्रकाशित झालेले आणि शिक्षणशास्त्रात मोलाची भर टाकणारे ग्रंथ/ पुस्तक प्रकाशकांनी किंवा लेखकांनी **दोन प्रतीत** मा.संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या नावे टपालाने किंवा हस्तपोच दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पाठवावेत.
- **पुरस्काराचे स्वरूप :** रक्कम रुपये १०,०००/- (दहा हजार मात्र), मानपत्र आणि स्मृतिचिन्ह.

प्रा. विजयकुमार पाईकराव
प्र. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा आणि
सदस्य सचिव, शिक्षणशास्त्र पुरस्कार समिती